# <u>जाहिरात</u>

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

**(महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीची कंपनी)**

**CIN No. : 70200MH1998SGC116664**

५ वा माळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१

**दुरध्वनी क्र. ६९२०६९२०**

**ई-मेल** :sppl_mumbai@rediffmail.com **वेबसाईट:**www.sppl.biz

क्रमांक:आस्था/नियुक्ती/८४५/२०२४ दिनांक: १४ जून, २०२४

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयात उप समाज विकास अधिकारी या पदाकरीता निव्वळ कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांकरीता नियुक्ती करणेबाबत**

शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयात खालील अटींची पूर्तता करणाऱ्या एक उप समाज विकास अधिकारी यांची **<u>११ महिन्यांकरीता निव्वळ कंत्राटी पध्दतीने व एकत्रित परिश्रमिकावर</u>** मुलाखतीने नियुक्ती करावयाची आहे. हे पद तात्पुरत्या स्वरुपाचे आहे. सदर नेमणूक कायम अथवा दीर्घ स्वरुपाची नाही, त्यामुळे सेवा नियमित होणार नाही.

**<u>कामाचे स्वरुप, अर्हता व अनुभव:</u>**

**(१) उप समाज विकास अधिकारी :** झोपडपट्टीवासियांची पात्रता ठरविणे, झोपडपट्टीवासियांना मार्गदर्शन करणे, त्यांचेकडून कागदपत्रे मागविणे, पात्रता निश्चित करणे, तसेच बृहन्मुंबईतील विविध ठिकाणी ४००० पेक्षा अधिक संख्येने असणाऱ्या संक्रमण सदनिकांचे व्यवस्थापन करणे आणि सदर संक्रमण सदनिका विविध विकासकांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरीता उपलब्ध करण्याची प्रक्रिया पूर्ण करणे, वेळोवेळी त्यांचे भाडे शिपुप्रमच्या धोरणानुसार निश्चित करुन ते वसूल करण्यासाठी पाठपुरावा करणे, भाडे व अनामत रक्कम जमा करुन घेणे, त्याचा विहीत नमुन्यात हिशोब ठेवणे, सदर हिशोब लेखा शाखेस वेळोवेळी उपलब्ध करुन देणे, त्रिपक्षीय करारनामा करण्याची प्रक्रीया पूर्ण करणे, सदर संक्रमण सदनिकांची देखभाल करण्यासाठी अभियांत्रिकी शाखेस कळविणे आणि शिपुप्रमच्या विविध योजनांसाठी शिपुप्रम आणि संबंधित लाभार्थी/ बाधित यांच्यात समन्वय साधण्यासाठी आवश्यक ती सर्व कामे करणे इत्यादि कामे व जबाबदाऱ्या पार पाडणे.

सातव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी S-14: 38600-122800 पे मॅट्रीक्स अथवा तत्सम पदावरील अशा स्वरुपाच्या समाज विकास विभागाच्या कामाचा किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक.

**वयोमर्यादा:** दि. १ एप्रिल, २०२४ रोजी वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.

**<u>एकत्रित वेतनाबाबत:</u>** उपरोक्त अनुभव असलेल्या तथापि सध्या खाजगी सेवेत असलेल्या व्यक्तीची निवड उप समाज विकास अधिकारी पदाकरीता झाल्यास सातवा वेतन आयोगाच्या पे मॅट्रीक्समधील रू.३८,६००/- हे मूळ वेतन + राज्य शासनाकडून वेळोवेळी सुधारीत दराने महागाई भत्ता + घरभाडे भत्ता जमेस धरून एकत्रित वेतन ठरविण्यात येईल. त्याखेरीज आवश्यकतेनुसार केवळ दूरध्वनी भत्ता देण्याचा विचार करण्यात येईल. इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

**अटी व शर्ती**

१. सदर स्वरुपाच्या कंत्राटी नेमणूकीकरीता उमेदवाराचे वय दि.१ एप्रिल, २०२४ रोजी ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. उपरोक्त नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपाची ११ महिन्यांच्या कालावधीसाठी राहिल. ती कायम अथवा दिर्घ स्वरुपाची नाही.
२. सदर पदावर निव्वळ कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात येईल. उमेदवारास कोणत्याही प्रकारच्या स्थायी सेवेसाठी दावा करता येणार नाही, किंवा सेवेत नियमित करण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.
३. उमेदवाराचे कामकाज कोणत्याही वेळी असमाधानकारक आढळल्यास मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने एक महिन्याची पूर्व सूचना देऊन सेवा समाप्त करण्यात येईल.
४. सेवा सोडावयाची झाल्यास किमान एक महिन्याची पूर्वसूचना अथवा एक महिन्याचे मूळ वेतन देणे आवश्यक राहील.
५. सदर कंत्राटी नेमणूक ११ महिन्यानंतर आपोआप संपुष्टात येईल. भविष्यातील परिस्थितीनुसार आवश्यकता भासल्यास पुन्हा ११ महिन्यांकरीता निव्वळ कंत्राटी नेमणूक करण्याचा विचार होऊ शकेल, तथापि सदर नियुक्ती कायम अथवा सेवा नियमित स्वरुपाची नाही, याची नोंद घेणे आवश्यक आहे.
६. कोणतेही कारण न देता अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे हा अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक, शिपुप्रम यांचा राहील.

इच्छुक उमेदवारांनी स्वत:च्या संपूर्ण माहितीसह अर्ज व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित (शिपुप्रम) गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे(पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांच्याकडे दिनांक २५ जून, २०२४ किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत पोहचतील, याची दक्षता घ्यावी.

**सही/-**

**दिनांक: १४ जून, २०२४**
**ठिकाण: मुंबई.**

**व्यवस्थापक (प्रशासन)**
**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित**